Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# 'स्मार्ट तांडा' : गरज, उपाय आणि आव्हाने

**एकनाथ विश्वनाथराव पवार**
साहित्यिक व विचारवंत
नागपूर ,महाराष्ट्र
भ्रमणध्वनी-९८५०१३१३६८
tandesamuchalo@gmail.com

**प्रस्तावना :**

'तांडेसामू चालो' या समग्र तांडावादी विचाराचा स्मार्ट तांडा आणि ग्लोबल तांडा हे प्रामुख्याने एक व्हिजन आहे. तांडाशिक्षणाची ज्योत तेवत ठेवणारा हा नवा विचार,नवा ध्यास नव्या पिढीच्या गळी उतरावा ही आज माफक अपेक्षा आहे. इंग्रजीतील 'स्मार्ट' या शब्दाचा मराठीत वेगवान,आधुनिक,विकसीत, तरतरित, हुशार, सुजाण असा अर्थबोध होतो. तांडा म्हणजे बंजारा समाजाची एक स्वतंत्र संस्कृती जोपासणारी एक वसाहत होय. बंजारा समाज देशभरातील अठरा राज्यात प्रामुख्याने असून आजही त्यांनी आपली तांडासंस्कृती जिवंत ठेवलेली आहे. भारतीय विविधता आणि ऐतिहासिक वलय यातून तांडयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**स्मार्ट व्हिलेज आणि स्मार्ट तांडा :**

ही भिन्न स्वप्ने आणि कृती आहेत. कारण तांडयाच्या बाबतीत एकूणच व्यापकता मात्र वेगळी आहे. व्हिलेज आधिच प्रवाहात आलेला एक ग्रामीण समुदाय आहे. परंतु तांडा मात्र या समुदायापेक्षा भिन्न आहे. तांडा हा पुर्णत: प्राकृतिक समुदायामध्ये येतो. बहुतांश तांडा आजही दुर्गमभागात निसर्गाच्या सानिध्याशी आहे.

नागरिकरण व महानागरिकरण ही अवस्था तांडयासाठी फार दूरवरची आहे. कारण ते व्हिलेजच्या प्रवाहापासून देखिल दूर आहे. ही सकल विषमता नाहिसे होऊन स्मार्ट तांडयाची पायाभरणी व्हावी, हाच विचार घेऊन आज वाटचाल सुरू आहे. स्मार्ट तांडा आणि स्मार्ट व्हिलेज ही भिन्न संकल्पना आहे.परंतु काहीप्रमाणात साम्यता देखिल दर्शवणारी असू शकेल.

**'स्मार्ट तांडा' ही काळाची गरज :**

तांडा फक्त पायाभूत सुविधेपासून संपन्न व्हावा. एवढ्यापुरते तांडेसामू चालो अभियानाचे हे व्हिजन मुळीच नाही. तर तांडा समग्रदृष्टीने,समग्र पैलूंनी विकसीत व्हावा. वेगवान व्हावा. आपले बलस्थाने कोणती? आपले अभाव उणिवता कोणती? आपले हितशत्रू कोणते? इष्ट-अनिष्ट काय? हे ओळखण्याची आणि त्यावर मात करण्याची हुशारी यावी. अज्ञान, अंधश्रद्धा,अर्धवट शिक्षण, अनारोग्य, वाचन-लेखनाचे अभाव, व्यसनाधिनता आदी जीर्णव्याधीने आलेली मरगळता, अशक्तपणा नाहिसे करून तांडा तरतरित व्हावा. जून्या अनिष्ठ कालबाह्य अविवेकी प्रथा व विचार त्यागून जागतिकीकरणांच्या दृष्टीने, संविधानिक साक्षरतेने अद्यावत व्हावा. 'सेनं सायी वेसं' हा बाळकडू घेत असतांनाही येणारी जात्यांधता, स्वार्थांधता आणि कृतघ्नता एकुणच समाजाला किती घातक आहे. ही समजण्याची आणि उमजण्याची सजगता यावी. वैचारिक प्रगल्भता यावी. हाच स्मार्ट तांडा व्हिजनचा समग्र परिपाक होय.

तांडा अनेक समस्येने अभावग्रस्त जीवन जगत आहे. जो तांडा संपूर्ण प्राणीमात्राला जीवनाचा आणि वैश्वीक कल्याणाचा संदेश अनंत काळापासून देत आहे. प्रचंड मेहनत,साहस आणि संघर्षला कवेत घेण्याचे सामर्थ्य बाळगतो आहे. परंतु तो तांडा मात्र काळोखात, मरगळलेल्या अवस्थेत राहतो आहे. नव्या युगातल्या नव्या पिढीच्या शिक्षणाची उमेद मात्र आजघडीला उसाच्या फडावर, विटभट्टीवर तर कुठे दारूच्या भट्टीवर, गुटखाच्या पानटपरीवर आणि चायना मोबाईलच्या दीड जीबी डेटामध्ये नाहिसी होत आहे.

आजही अनेक तांडयापर्यंत स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतर ही साधे रस्ते व दळणवळणाची साधने पोहचू शकली नाही. अनेक मैलावरून डोक्यावर हंडा घेत पाण्यासाठीची पायपीट अजूनही थांबलेली नाहित. शासनाच्या काही लोककल्याणकारी योजना आहेत, ते लाभार्थ्यापर्यंत अजुनही पोहोचली जात नाही. तांडाबाहेरची शौचालयाची उठबस थोडीशी थांबू पाहत आहे. पण एकिकडे शौचालय नाही. शौचालय आहे तर पाणी नाही. पाणी आहे तर स्वच्छतेच्या नियमाची साक्षरता नाही. दिवस येत आहे, दिवस जात आहे यातच कित्येक पिढया लोटत आहे. कदाचित यापेक्षाही तांडयाच्या अभावग्रस्त जीवनाची भयानता राहू शकते. म्हणून ही अभावग्रस्ताची स्थिती दूर करण्यासाठी आज 'स्मार्ट तांडा' होणे काळाची नितांत गरज आहे.

**'स्मार्ट तांडा' करीता उपाय :**

हे व्हिजन प्रत्यक्षात उतरवण्यासाठी समाजातील प्रज्ञावंत आणि लोकप्रतिनीधीचा सहयोग देखिल तितकाच महत्वाचा आहे. पायाभूत भौतिक सुविधा हे 'स्मार्ट तांडा' चा प्राथमीक टप्पा आहे. आता दळणवळणाची सुविधा देखिल प्राथमिक गरज बनली आहे. त्यासोबतच डिजीटल शाळा, वाचनालय, ई- कोचिंग उभारणे. संगणकांचा वापर, स्पर्धा परिक्षांसाठी प्रोत्साहन, फ्रुट होमनर्सरी, ग्रिन होम, सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, जलसंवर्धन, आरोग्यशिबीरे, प्राथमीक आरोग्य केंद्रात वाढ करून उपकेंद्र निर्मीती, मोबाईल डिस्पेन्सरी तसेच ई-कौशल्य यातून पारंपारिक कलाकुसर कशिदाकाम आणि अन्य कौशल्याचे प्रशिक्षण सुविधा व साहित्यनिर्मीती मिनी शॉप, कुटीरोदयोग व लघुउदयोग उभारणी. शेती व शेतीपुरक व्यवसायाला आधुनिकतेची जोड. स्वयंरोजगारावर अधिक भर अशा विविध उपाययोजना आवश्यक आहे.महिला बचत गट दवारे महिला सक्षमीकरणावर भर दयावे. दरवर्षी किंवा किमान पंचवार्षिकीमध्ये प्रायोगीकरूपाने प्रत्येक जिल्हयातून शासनाने 'स्मार्ट तांडा' करण्यासाठी निवड करावी. आणि शासनाच्या या अशा धोरणाला अधिक पाठबळ देण्यासाठी लोकांनी आपला सहभाग देखिल नोंदवीणे आवश्यक असू शकेल.

**'स्मार्ट तांडा' पुढील आव्हाने :**

स्मार्ट तांडा ही शासनाची जेवढी जबाबदारी आहे. तेवढीच समाजघटकाची देखिल आहे. स्मार्ट तांडा साकारण्यात निश्चितच अनेक आव्हाने आहेत. निरूत्साह, उदासिनता आणि नव्या काळाचा वेध घेण्याच्या भूमिकांचा अभाव हेच खरे आव्हान 'स्मार्ट तांडा' पुढे आहे. कारण 'स्मार्ट तांडा' ही एक व्यापक संकल्पना आहे. 'स्मार्ट तांडा' हे प्रत्यक्षात काही कालावधीत साकारणे हे तेवढे सोपे सहज काम नाही. परंतु अशक्य मात्र मुळीच नाही. यासाठीं मानवी संसाधने आणि कौशल्यविकासावर भर दयावे लागतील. डोंगराळ व दुर्गम भागात अधिकतेने तिडा वसाहती आहेत. तिथे स्मार्ट तिडा करीता निश्चितच काही अडचणीचा सामना करावा लागेल.

**निष्कर्ष:**

स्मार्ट तांडयात एकुणच तांडाजीवनाचे भविष्य उज्वल आहे. तांडेसामृ चालो अभियानातून ही संकल्पना आज पुढे आणली जात आहे. समग्र तांडाविकासाचा हा दृढविश्वास आहे. त्यामुळे कधिना कधीतरी ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली जाईल. आणि 'स्मार्ट तांडा' म्हणून तांडयालाही भविष्यात नावलौकिकता मिळेल.

**संदर्भ:**

1.स्मार्ट व्हिलेज

2.साप्ताहिक बंजारा पुकारातील तांडा प्रश्नावरील बातम्या

3.लोकराज्य मासिक